| MHKO070006952021 | **रे.क.नं.११६/२०२१**<br>हणमंत अजित राऊत<br>विरुध्द<br>सुनिल बापू घूलांडे आणि इतर |
|---|---|

**निशाणी क्र.५३ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.१ चे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ होवुन प्रतिवादी क्र.१ चे विरुध्द झालेला अबेंटमेंट सेट असाईडचा आदेश रद्द होणेस परवानगी मिळणेविषयी दाखल केलेला आहे.

०२. वादी यांनी त्यांचे अर्जात थोडक्यात असे कथन केले आहे की, सदर कामातील प्रतिवादी क्र.१ सुनिल बापू घुलांडे हे दि.१३/०६/२०२३ रोजी मयत झाले आहेत. सदरचा दावा स्थावर मिळकतीबाबत असून सदर कामी प्रतिवादी क्र.१ यांचे वारस सामील असणे आवश्यक आहे. प्रस्तुत वादी हे शेती बरोबरच बोअरची मोटर दुरुस्तीचे कामकाज करतात, त्यामुळे त्यांना वारंवार बाहेरगावी जावे लागते, तसेच प्रस्तुत वादी हे मळ्यात वास्तव्यास असलेने प्रतिवादी मयत झालेली माहिती प्रस्तुत वादींना मुदतीत मिळू शकली नाही. प्रतिवादी क्र.१ हे मयत झालेचे वादींना उशिरा समजले. दरम्यान त्यांच्या मृत्यूची माहिती तात्काळ मिळाली नाही. मयताचे वारसांबाबतची माहिती सुध्दा वेळेत मिळू शकली नाही, तसेच संबंधीतांचे नातेवाईकही वारसांची माहिती देण्यास टाळाटाळ करत होते. प्रस्तुत वादी यांचे आई वडील वयस्कर असुन त्यांना उच्च रक्तदाबाचा त्रास आहे. तसेच वादीचे आई यांना रक्तदाबाबरोबरच मधुमेहाचाही आजार आहे. त्यामुळे त्यांना दवाखान्यात घेवुन जाणे औषधोपचार करणे यामध्ये सुध्दा प्रस्तुत वादी यांना व्यस्त रहावे लागले आहे. विलंब माफ करुन वारस रेकॉर्डवर आणल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान नाही. तथापि वारस रेकॉर्डवर आणले नाहीत तर वादीचा दावा निरर्थक होवुन वादी यांचे पैशात न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी क्र.१ चे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब माफ करणेत यावा व अबेटमेंट सेट असाईड व्हावी अशी विनंती वादी यांनी केलेली आहे.

०३. प्रतिवादी क्र.२ ते ७ यांनी सदर अर्जाच्या पाठीमागेच आपले म्हणणे देवुन कथन केले आहे की, वादीचे अर्जातील संपुर्ण मजकुर खोटा व चुकीचा आहे. अर्जातील नमुद कारणे संयुक्तीक नाहीत. वादीने जाणुनबूजुन सुमारे २ वर्षांचा विलंब केला आहे. सदर काम पुरावे करीता नेमले आहे. वादीने अद्याप पुरावा दिला नाही. वादीचा अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा. वादीस कॉस्ट र.रु.५०००/– करणेत यावी अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादी यांनी केलेली आहे.

०४. उभयपक्षाच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा हा कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादीने आपली भिस्त खालील न्यायनिवाडयावर ठेवलेली आहे.

*1) Girija Shankar Singh and others Vs. Ram Singh and others (1980) AIR (Allahabad) 334 in the Hon'ble Allahabad High Court*

०५. प्रतिवादी क्र.१ चे मृत्यू प्रमाणपत्र हे नि.क्र.५२ वर दाखल आहे. त्यावरुन प्रतिवादी क्र.१ मयत झाल्याचे स्पष्ट होते. विरुध्द बाजुने सदर प्रतिवादी क्र.१ मयत न झालेबाबत वाद उपस्थीत केलेला नाही. वादीने प्रस्तुतचा दावा हा मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादीची विनंती पाहता त्यांनी त्यामध्ये दावा मिळकतीच्या त्यांच्या शांततामय कब्जेवहीवाटीस प्रतिवादीतर्फे इसम, एजंट, नोकर, चाकर यांनी हारहरकत अडथळा करु नये अशी मागणी केलेली आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादी क्र.१ तर्फे इसमांच्या विरोधात देखील मुळ मागणी केलेली आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्र.१ च्या मृत्यूनंतर त्यांचे वारस जर अभिलेखावर घेतले गेले तर कोणत्याही पक्षकाराचे नुकसान होणार नाही. दावा स्थावर मिळकतीबाबत आहे. वादी व प्रतिवादीमधील वाद पाहता तो ब–याच दिवसापासुन चालू असल्याचे दिसुन येत आहे. वादी कथित प्रमाणे प्रतिवादीकडुन गैरकृत्य हे चालू आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये फक्त एकच प्रतिवादी नसुन अनेक प्रतिवादी आहेत. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादीच्या वारसांचे म्हणणे सुध्दा ऐकुण घेणे गरजेचे आहे. विरुध्द बाजुचे कथन पाहता त्यांनी विलंबाबाबत नमुद केले आहे. वादीचा अर्ज पाहता त्यांनी विलंबाबाबत कारण दिल्याचेही दिसुन येत आहे. तसेच वर नमुद न्यायनिवाडयाचे अवलोकन केले असता right

to sue survive होत असेल तर वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे आहे. त्यामुळे वादीची विनंती पाहता प्रतिवादी क्र.१ तर्फे इसमांना देखील अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. वादी व प्रतिवादी मधील वाद हा जमिनीच्या अनुषंगाने आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ च्या वारसांचे कथन सुध्दा सदर दाव्यामध्ये महत्वाचे आहे. प्रस्तुतचे प्रकरण हे उभयपक्षातील वादाचे संपूर्ण निराकरण करण्यासाठी व प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्याच्या उद्देशाने वादी यांना संधी देणे विधीसंगत वाटते. परंतु, संधी देताना त्यांनी घेतलेल्या वेळेच्या अनुषंगाने प्रतिवादींना खर्च देणे देखील गरजेचे आहे. करिता खालील आदेश पारीत करण्यात येतो–

– **आदेश** –

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.५३) वादी यांनी खर्च म्हणून आव्हानित प्रतिवादी यांना र.रू.३००/– (र.रु.तीनशे फक्त) देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी नं.१ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश खर्चाची पुर्तता झाल्यास रद्द समजावा. तसेच प्रतिवादी नं.१ चे वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब खर्चाची पुर्तता झालेस माफ करणेत येईल.

३. खर्चाची पुर्तता पुढील तारखेस किंवा तत्पुर्वी करावी.

४. दोन्ही पक्षकारांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.05.06 17:32:10 +0530

दि.०६/०५/२०२६

जयसिंगपूर.

**(अ. त्रिं. मनगिरे)**

सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 06/05/2026. |
| Judgment/order signed by the PO on | 06/05/2026. |
| Judgment/order uploaded on | 06/05/2026. |